१९. **''ठेव विमा महामंडळ''** म्हणजे ठेव विमा महामंडळ कायदा १९६१ च्या कलम ३ नुसार स्थापन करण्यात आलेले डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन.

२०. **''थकबाकीदार (डिफॉल्टर)''** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ (सी)(ए) नुसार थकबाकी करणारी व्यक्ती.

२१. **''विलफूल डिफॉल्टर''** म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वेळोवेळी दिलेले अध्यादेश व मार्गदर्शक तत्वांचे हेतूपुर:स्सर उल्लंघन करणारा थकबाकीदार सभासद होय.

२२. **''सहकार वर्ष''** म्हणजे दि. ०१ एप्रिल ते ३१ मार्च मधील कालावधी.

२३. कार्यक्षेत्र म्हणजे पोटनियम क्र.३ नुसार ज्या क्षेत्रामधील व्यक्तींना बँकेचे सभासद म्हणून स्विकारण्यात येते असे क्षेत्र.

२४. **''सहकारी तत्वे''** म्हणजे १९९५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी असोसिएशन यांनी तयार करुन आजतागायत वेळोवेळी सुधारणा केलेली सहकाराची तत्वे होय.

२५. **''राज्य सरकार''** म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार होय.

२६. कर्मचारी म्हणजे बँकेच्या सेवेमध्ये कार्यरत असलेली व बँकेशी करारान्वये नोकरीत असलेली व्यक्ती. मात्र कमिशन बेसीसवर काम करणाऱ्या व्यक्ती सेवक संबोधण्यात येणार नाहीत.

२७. **''नोटीफिकेशन''** म्हणजे केंद्र व राज्य सरकारच्या अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिध्द करण्यात आलेले नोटीफिकेशन.

२८. **''बँक''** म्हणजे पार्श्वनाथ को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

२९. **''बी.आर.ॲक्ट''** म्हणजे बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (सहकारी बँकांना लागू केलेले)

३०. **''कार्यलक्षी संचालक''** म्हणजे कार्यकारी संचालक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा कोणत्याही अशा पदावर असणारी व्यक्ती जी संचालक मंडळाने मुख्य अधिकारी म्हणून नेमली आहे.

## ५. उद्देश :

बँकेचा मुख्य उद्देश ठेवीदारांचे हित जपणे हा असून सभासदांमध्ये सामाजिक व आर्थिक प्रगती साधणे व सदर प्रगती सहकाराच्या तत्वानुसार स्वत:साठी व एकमेकांसाठी एकमेकांच्या मदतीद्वारे साधणे.

१. सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्याची भावना वृध्दिगंत करणे.

२. जनतेकडून ठेवी स्विकारणे, त्याचा विनियोग कर्ज देणे अथवा गुंतवणूक करणे तसेच स्विकारलेल्या ठेवी मागणी करताच अगर मुदतीने रोख, चेक, डिमांड ड्राफ्ट अथवा इतर कोणत्याही मार्गाने परत करणे.

३. बँकींग व्यवसायासाठी कर्ज काढणे अथवा पैशाची उभारणी करणे.

४. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचना व सहकारी खात्याच्या मंजूरीने तयार करण्यात आलेले नियम/पोटनियमातील तरतूदीचे मर्यादेत राहून सभासदांना